



दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी


**उद्या अंक नाही**

शनिवार दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र दिन निमित्त दै. हिंदू प्रकाशवार्ता कार्यालयास सुट्टी आहे. त्यामुळे रविवार दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक


छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ११६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## थोडक्यात वार्ता

### शहरातील अनधिकृत होर्डिंगवर महानगरपालिकेची कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर शहरातील सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांच्या कडेला, चौकांमध्ये तसेच महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या अनधिकृत होर्डिंग, जाहिरात फलक व बॅनर्सविरोधात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

महानगरपालिका प्रशासनाने शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांची पाहणी करून त्यांची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली असून, परवानगी न घेता उभारलेले तसेच मंजूर परवानगीच्या अटींचे उल्लंघन करणारे होर्डिंग तातडीने हटविण्याची कारवाई करण्यात येणार आहे. विशेषतः रस्ते, चौक, पदपथ, सार्वजनिक जागा, शासकीय/महानगरपालिका मालमत्ता तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या अनधिकृत जाहिरात फलकांवर प्राधान्याने कारवाई करण्यात येईल. या कारवाईदरम्यान संबंधित होर्डिंगधारक, जाहिरातदार, जाहिरात एजन्सी तसेच जागामालक यांची जबाबदारी निश्चित करून, लागू असलेल्या नियमांनुसार दंडात्मक कारवाई, होर्डिंग जप्त करणे व संबंधितांकडून कारवाईचा खर्च वसूल करणे याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

शहरातील सर्व अधिकृत होर्डिंगधारक व जाहिरातदारांनी महानगरपालिकेची आवश्यक परवानगी घेऊनच जाहिरात फलक उभारावेत. परवानगीशिवाय कोणतेही होर्डिंग किंवा जाहिरात फलक उभारू नयेत, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच नागरिकांनी त्यांच्या परिसरातील अनधिकृत होर्डिंग, जाहिरात फलक किंवा बॅनर्सची माहिती महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडे द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. "शहराचे विद्रुपीकरण, वाहतुकीस अडथळा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण करणाऱ्या अनधिकृत होर्डिंगविरोधात महानगरपालिका प्रशासनाची कारवाई यापुढे अधिक तीव्र करण्यात येणार आहे", छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यावेळी म्हणाले.

### उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यात बोगदा दुर्घटना, 7 ठार, 3 बेपत्ता

चमोली : उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यातील जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला आहे. अद्याप तीन जण बेपत्ता आहे. बेपत्ता असलेल्यांचा शोध सुरू आहे. बोगद्यात झालेल्या पडझडीमुळे संकटात सापडलेल्यांपैकी १२ जणांची सुरक्षित सुटका करण्यात यश मिळाले आहे. NDRF आणि SDRF तसेच राज्य पोलीस, CISF, ITBP आणि जिल्हा प्रशासन मदतकार्य करत आहे.

ज्यावेळी पडझड सुरू झाली त्यावेळी बोगद्यात अधिकारी-कर्मचारी असे एकूण २२ जण होते. त्यापैकी १२ जणांना वाचवले आहे. सात जणांचा मृत्यू झाला. मृतांचे मृतदेह पण बोगद्याबाहेर आणले आहेत. आता सततच्या पावसामुळे आणि बोगद्यातील पाण्याची पातळी वाढत असल्यामुळे बचावकार्यात अडथळा येत आहे. जलविद्युत प्रकल्पासाठी तयार होत असलेल्या बोगद्याची सध्याची एकूण लांबी अडीच किलोमीटर एवढी आहे. या बोगद्यात सुमारे सहा फूट उंचीपर्यंत पाणी शिरले आहे. पाण्याचा वेगवान प्रवाह आणि ऑक्सिजनची कमी झालेली पातळी तसेच भूस्खलनाचा धोका यामुळे मदतकार्याचा वेग मंदावला आहे. सुरक्षेची खबरदारी घेऊन मदतकार्य सुरू आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी चमोली येथील बोगद्यातील दुर्घटनेची दंडाधिकारी चौकशी करण्याचे आदेश दिले असून, या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची नुकसान भरपाई जाहीर केली आहे.

### "शाल जोडे"




# परभणीचे सिविल सर्जन डॉ नागेश लखमावार व जीपचे आरोग्य अधिकारी डॉ संजय पांचाळ निलंबित

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

**परभणी:-** गेल्या अनेक किती दिवसापासून आरोग्यविषयक च्या अनेक तक्रारी तक्रारीची कुजबुज चालू असतानाच आरोग्य विभागातील गंभीर निष्काळजीपला कर्तव्यातील हलगर्जीपणा प्रशासकीय अनियमितता प्रकरणी परभणी जिल्ह्यातील दोन वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यावर राज्य शासनाच्या आदेशानुसार तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे सविस्तर अधिक माहिती अशी की जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संजय पांचाळवआणी जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार या दोन्ही वरिष्ठ वैद्यकीय



अधिकाऱ्यांना 13 अगस्त रोजी जारी केलेल्या आदेशानुसार तात्काळ तडका फडकी निलंबित करण्यात आले

जिंतूर येथील घटने प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर नागेश लखमावार यांना उपसचिव दीपक केंद्रे यांनी निलंबित केले आहे जिंतूर येथील एका घरगुती महिला रुग्णाला परभणी येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाचे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते मात्र पुरेशा उपचारा व्हावे त्या गर्भवती महिलेचा व तिच्या गर्भातील बाळाचा मृत्यू झाला ही अत्यंत गंभीर बाब समोर आल्यानंतर डॉक्टर नागेश लखमावार यांनी नियंत्रकीय व परिवेक्षकीय जबाबदारी योग्य रीतीने पार न पाडता कर्तव्यामध्ये गंभीर कसूर केल्याचे निष्पन्न झाले आहे महाराष्ट्र नागरी सेवा( शिस्त व अपील) नियम 1979 च्या नियम4(1)(अ) मधील तरतुदीनुसार तात्काळ निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विरोधात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे .

सदरील निलंबित कालावधी त्यांचे मुख्यालय उपसंचालक आरोग्य सेवा लातूर मंडळ कार्यालय येथे निश्चित करण्यात आले आहे तर प्रशासकीय व आर्थिक अनियमितेतप्रमाणे प्रकरणी डॉ संजय पांचाळ यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप ठेवण्यात आले आहेत आरोग्य अधिकारी डॉक्टर पांचाळ हे प्रशासकीय कामकाजाकडे अक्षम्य दुर्लक्ष करून गैरवर्तणूक करत असल्याचे तसेच त्यांनी प्रशासकीय व वित्तीय कामकाजात गंभीर अनियमितता करून कर्तव्यात कसूर केल्याचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी नतिषा महत्व यांनी दिला होता या अहवालाच्या आधारे शासनाने त्यांच्यावर विभागीय चौकशी बसविली असून महाराष्ट्र नागरी सेवा नियमाने त्यांना तात्काळ तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. डॉक्टर पांचाळ यांचे मुख्यालय जिल्हा रुग्णालय धाराशिव येथे निश्चित करण्यात आले आहे महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशान्वये केंद्रे यांनी हे नीलमनाचे आदेश जारी केले आहेत आरोग्य विभागातील या मोठ्या धडक कारवाईमुळे परभणी जिल्ह्यातील प्रशासकीय व आरोग्य वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली असून आणखी कोणा कोणावर कार्यवाही होणार याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागलेले आहे .

# एमआयएम नगरसेवक यांच्या अनधिकृत बांधकामाच्या नोटीसवर अचानक कारवाईचा बडगा की राजकीय दबाव?

## अवैध बांधकामाचा व्हिडिओ काढल्याने 14 वर्षीय मुलाला मारहाण केल्याचा आरोप

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** हर्सूल प्रभाग क्रमांक १ मधील एमआयएमचे नगरसेवक यांच्या घरावर सुरू असलेल्या अवैध बांधकामाची कारवाई मोबाईलमध्ये टिपत असताना, एका चौदा वर्षीय मुलाला मारहाण करण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून राजकीय वर्तुळात या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे. नगरसेवक अशोक हिवराळे यांच्याविरुद्ध महापालिका प्रशासनाकडे अनधिकृत बांधकामाबाबत अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली होती. एवढेच नव्हे तर, या प्रकरणी हिवराळे यांना नगरसेवक पदावरून अपात्र ठरविण्यात यावे, अशी ठाम मागणीही करण्यात आली आहे. या तक्रारीची दखल घेत महापालिकेने हिवराळे यांना सप्टेंबर महिन्यात सुनावणीसाठी हजर राहण्याचे पत्र बजावले आहे.

गुरुवारी नगरसेवक हिवराळे यांच्या घरावर अनधिकृत बांधकाम पाडण्याची कारवाई सुरू असल्याची कुणकुण तक्रारदाराला लागली. या कारवाईचे मोबाईलमध्ये चित्रीकरण करण्यासाठी एका चौदा वर्षीय मुलाला संबंधित ठिकाणी पाठविण्यात आले होते. जेव्हा हा मुलगा कारवाईचा व्हिडिओ काढत होता, तेव्हा त्याला पकडण्यात आले आणि मारहाण करण्यात आली, असा आरोप करण्यात आला आहे. या झटापटीत व मारहाणीत त्या मुलाच्या शरीरावर किरकोळ जखमा झाल्याचे सांगण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच माजी नगरसेवक रुपचंद वाघमारे तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी मध्यस्थी करत त्या मुलाची सुटका केली. त्यानंतर त्याला सुरक्षित बाहेर काढण्यात आले. माध्यमांशी बोलताना रुपचंद वाघमारे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, अपात्रतेच्या तक्रारीवर अद्याप महापालिकेची कोणतीही सुनावणी झालेली नसताना आणि कोणताही अंतिम निर्णय आलेला नसताना नेमकी कोणतीही पूर्वकल्पना न देता अवैध बांधकाम पाडण्याची कारवाई का करण्यात आली? सुनावणी झाल्यानंतर प्रशासनाकडून जो काही निर्णय दिला जाईल, तो आम्हाला पूर्णपणे मान्य असेल; परंतु एका लहान मुलाला व्हिडिओ काढत असल्याच्या कारणावरून मारहाण करण्याची कोणतीही गरज नव्हती. या प्रकरणी मुलाच्या पालकांनी पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल करायची किंवा नाही, याचा सर्वस्वी निर्णय त्याचे पालकच घेतील. त्यापूर्वी या मुलाला उपचारासाठी तातडीने रुग्णालयात नेण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, महापालिकेने सप्टेंबर महिन्यात सुनावणीसाठी हजर राहण्याचे पत्र दिले असले, तरी त्यांच्या घराची एक खोली अनधिकृत असल्याने ती स्वतःहून पाडण्याचे काम सुरू होते. त्याच वेळी हा प्रकार समोर आल्याचे त्यांनी सांगितले. आता या संपूर्ण प्रकरणात मुलाच्या पालकांकडून नेमकी कायदेशीर पोलीस तक्रार दाखल केली जाते आणि येत्या काळात महापालिका प्रशासनाच्या सुनावणीत काय निर्णय होतो, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.



**या सर्व प्रकरणावर प्रतिक्रिया देताना नगरसेवक अशोक हिवराळे यांनी आपल्यावर करण्यात आलेले मारहाणीचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. त्यांनी आपली बाजू मांडताना सांगितले की, संबंधित मुलगा त्यांच्या कुटुंबातील महिला सदस्यांचा मोबाईलमध्ये विनाकारण व्हिडिओ काढत होता. तो प्रकार लक्षात आल्यानंतर त्याला हटकण्यात आले आणि पळून जात असताना त्याला पकडण्याचा प्रयत्न केला गेला. या संपूर्ण प्रक्रियेत केवळ एक सामान्य झटापट झाली. या ओढाताणीत व झटापटीत त्या मुलाच्या कपड्यांचे नुकसान झाले आणि नखे लागल्यामुळे किरकोळ ओरखडे किंवा जखमा झाल्या असण्याची शक्यता आहे; परंतु आपण किंवा आपल्या समर्थकांनी त्या मुलाला कोणतीही गंभीर स्वरूपाची मारहाण केलेली नाही, असा दावा हिवराळे यांनी केला.**

**- नगरसेवक अशोक हिवराळे**

# तिरंगा रॅलीतून मराठवाड्याला दुष्काळमुक्तीचा निर्धार : मुख्यमंत्री फडणवीस



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** युवाशक्तीच्या नवसंकल्पनांना आणि सामर्थ्याला योग्य दिशा दिल्यास विकसित भारताचे स्वप्न साकार होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत बलशाली व संपन्न राष्ट्र म्हणून जगात लौकिक प्राप्त करीत आहे. त्याच धर्तीवर मराठवाड्यालाही सुजलाम्-सुफलाम् करून दुष्काळमुक्त करण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

'हर घर तिरंगा अभियान' अंतर्गत महात्मा ज्योतिबा फुले पुतळा, संभाजीनगर ते क्रांती चौकदरम्यान भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिवादन केल्यानंतर रॅलीला सुरुवात झाली. रॅलीचा समारोप क्रांती चौकात झाला.

यावेळी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, तिरंगा ही देशाची आन, बान आणि शान आहे. या तिरंग्यासाठी हजारो देशभक्तांनी बलिदान दिले आहे. २ ते १५ ऑगस्टदरम्यान तिरंगा यात्रा काढून देशप्रेमाने ओतप्रोत मातृभूमीचे दर्शन घडविण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्यानुसार छत्रपती संभाजीनगरात नागरिक मोठ्या संख्येने तिरंगा रॅलीत सहभागी झाले आहेत. रॅलीला मिळालेला प्रतिसाद कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दशकात देशाने प्रगतीपथावर मोठी झेप घेतली असून, जगातील बलशाली देश म्हणून भारताची ओळख निर्माण झाली आहे. देशाची अर्थव्यवस्था जगातील चौथ्या क्रमांकाची झाली असून महाराष्ट्राची अर्थव्यवस्थाही मोठ्या प्रमाणात विस्तारली आहे. मराठवाड्याच्या पुढील पिढीला दुष्काळ पाहावा लागू नये, यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. कोकणातील समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत असून, 'सुजलाम्-सुफलाम्'च्या माध्यमातून तिसरी 'स्टार्ट अप इकोसिस्टिम' तयार करण्यात आली आहे.

# पैठणी-हिमरू कारीगरांसाठी विशेष आर्थिक पॅकेज द्या; मासिक पेन्शन, आरोग्य विम्यासह राष्ट्रीय विकास केंद्राची खा. भुमरे यांची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ओळख असलेल्या पैठणी आणि हिमरू कलेला जिवंत ठेवणाऱ्या कारीगरांना आर्थिक स्थैर्य व सामाजिक सुरक्षा मिळावी, यासाठी छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदिपान भुमरे यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह यांच्याकडे विशेष आर्थिक पॅकेजची मागणी केली आहे. कारीगरांसाठी मासिक पेन्शन, आरोग्य व अपघात विमा तसेच त्यांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली.

पैठणी आणि हिमरू ही महाराष्ट्राच्या पारंपरिक हस्तकला व विणकाम परंपरेची अमूल्य ओळख आहे. या उत्पादनांना देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी असली, तरी ही कला जपणाऱ्या कारीगरांची आर्थिक परिस्थिती मात्र अत्यंत हलाखीची असल्याचे भुमरे यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

पारंपरिक पैठणी साडी तयार करण्यासाठी कारीगराला सुमारे एक ते दीड महिना लागतो. हिमरू शाल तयार करण्यासाठीही सुमारे १५ दिवस किंवा त्याहून अधिक काळ मेहनत घ्यावी लागते. मात्र, बाजारात पैठणीची किंमत हजारो ते लाखो रुपयांपर्यंत असताना कारीगराचे मासिक उत्पन्न अनेकदा केवळ १२ ते १५ हजार रुपयांपर्यंत मर्यादित राहते. उत्पादनाच्या बाजारमूल्याच्या तुलनेत कारीगराला मिळणारा मोबदला अत्यल्प असल्याचे भुमरे यांनी नमूद केले.

अनेक कारीगर वयाची ६० ते ७० वर्षे ओलांडल्यानंतरही



उदरनिर्वाहासाठी हातमागावर काम करीत आहेत. त्यामुळे पात्र कारीगरांना किमान पाच हजार रुपये मासिक पेन्शन देणारी योजना सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

पैठणी व हिमरू कारीगरांसाठी स्वतंत्र विशेष पॅकेज मंजूर करून 'कारीगर सन्मान निधी' स्थापन करावा, मजुरीचे किमान मानक निश्चित करावे आणि कच्च्या मालावर विशेष केंद्रीय अनुदान द्यावे, अशी मागणी भुमरे यांनी केली. महिला कारीगरांसाठी स्वतंत्र योजना, आरोग्य व अपघात विमा, मुलांसाठी शिष्यवृत्ती तसेच ऑनलाइन विक्रीसाठी प्रभावी व्यवस्था निर्माण करण्याची मागणीही त्यांनी केली.

छत्रपती संभाजीनगर येथे 'राष्ट्रीय पैठणी-हिमरू विकास व संशोधन केंद्र' स्थापन करावे, अस्सल उत्पादनांना प्रमाणिकता प्रमाणपत्र द्यावे आणि कारीगरांचे राष्ट्रीय स्तरावर सर्वेक्षण करून नोंदणी करावी, अशीही मागणी करण्यात आली.

पैठणी आणि हिमरू ही केवळ उत्पादने नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग आहेत. या कलेचे संरक्षण करण्यासोबतच ती पिढ्यान्पिढ्या जपणाऱ्या कारीगरांचे आर्थिक व सामाजिक जीवन सुरक्षित करणे आवश्यक आहे, असे खासदार संदिपान भुमरे यांनी म्हटले.










दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## कर्तृत्वाचा राष्ट्रीय बहुमान

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला जाहीर झालेल्या राष्ट्रपती पदकांमध्ये महाराष्ट्रातील पोलीस, कारागृह, अग्निशमन आणि नागरी संरक्षण दलातील अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी मारलेली बाजी ही संपूर्ण राज्यासाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणे, गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवणे आणि आपत्कालीन परिस्थितीत स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता जनतेचे रक्षण करणे, या अत्यंत कठीण आणि जबाबदारीच्या भूमिकेत या सर्व शूरवीरांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाकडून मिळालेला हा बहुमान त्यांच्या अहोरात्र सेवेची आणि निष्ठेची पोचपावती आहे. अपर पोलीस महासंचालक शिरीष जैन यांच्यासह पाच अधिकाऱ्यांना मानाचे राष्ट्रपती उत्कृष्ट सेवा पदक जाहीर होणे ही अत्यंत गौरवास्पद बाब आहे. त्यासोबतच ३७ अधिकारी व कर्मचाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवा पदके मिळणे, यावरून महाराष्ट्राच्या पोलीस दलाचा दर्जा आणि गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. केवळ पोलीस दलच नव्हे, तर कारागृह प्रशासन, अग्निशमन सेवा आणि नागरी संरक्षण क्षेत्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानाची दखल केंद्र सरकारने घेतली आहे. अहोरात्र ताणतणावात काम करणाऱ्या आणि कौटुंबिक सुखांचा त्याग करून जनतेच्या रक्षणासाठी तत्पर असणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या पाठीवर मारलेली ही शाबासकीची थाप आहे. संकटाच्या काळात नागरिकांच्या रक्षणासाठी तत्पर राहणाऱ्या या योध्यांचा सन्मान केल्याने इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाही अधिक निष्ठेने काम करण्याची प्रेरणा मिळेल. राज्याच्या सुरक्षेची आणि समृद्धीची धुरा या सर्व जवानांच्या खांद्यावर असते. या राष्ट्रपती पदकांच्या रुपाने मिळालेल्या सन्मानामुळे महाराष्ट्राची मान राष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा उंचवली आहे. या सर्व पदकाधिकाऱ्यांचे कौतुक करतानाच, भविष्यातही ते याच निष्ठेने आणि शौर्याने राज्याची सेवा करत राहतील, असा विश्वास वाटतो.

# भारतीय स्वातंत्र्याच्या वाटचालीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान आणि वंचितांच्या हक्कासाठी संघर्ष

भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास हा केवळ परकीय सत्तेविरुद्ध लढलेल्या संघर्षाचा इतिहास नाही; तो माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी झालेल्या सामाजिक, वैचारिक आणि मानवी संघर्षाचाही इतिहास आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने ब्रिटिशांच्या गुलामगिरीच्या बेड्या तोडल्या, परंतु स्वातंत्र्याचा खरा अर्थ केवळ परकीय सत्ता देशातून हद्दपार होण्यात नाही. ज्या समाजात शतकानुशतके जात, अस्पृश्यता, विषमता, अज्ञान आणि सामाजिक अन्यायाच्या बेड्या होत्या, त्या बेड्या तोडल्याशिवाय भारत खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ शकत नाही ही जाणीव ज्यांनी भारतीय समाजाला दिली, त्या महान विचारवंतांमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संघर्ष हा केवळ एका समाजाच्या हक्कांसाठी नव्हता; तो स्वाभिमान, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित आधुनिक भारताच्या निर्मितीसाठीचा संघर्ष होता. त्यांनी वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाच्या वेदनांना आवाज दिला. ज्यांना शतकानुशतके शिक्षणापासून, मंदिरापासून, सार्वजनिक पाण्यापासून, सन्मानाने जगण्याच्या अधिकारापासून दूर ठेवण्यात आले, त्यांच्या हातात त्यांनी ज्ञानाचे शस्त्र दिले आणि त्यांना सांगितले "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा."भारतीय स्वातंत्र्याची वाटचाल समजून घेताना बाबासाहेबांचे योगदान केवळ एका विशिष्ट राजकीय चौकटीत पाहणे म्हणजे त्यांच्या व्यापक राष्ट्रनिर्माणाच्या कार्याला मर्यादा घालणे होय. त्यांनी भारताच्या राजकीय स्वातंत्र्यासोबतच सामाजिक स्वातंत्र्य, आर्थिक न्याय आणि घटनात्मक लोकशाही यांची पायाभरणी केली. कारण त्यांच्या दृष्टीने भुकेल्या माणसासाठी अन्नाचा अधिकार, वंचितांसाठी शिक्षणाचा अधिकार, स्त्रियांसाठी समानतेचा अधिकार आणि प्रत्येक नागरिकासाठी प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार हेच स्वातंत्र्याचे खरे मापदंड होते.

आज आपण स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करतो; तिरंगा अभिमानाने फडकवतो. परंतु या तिरंग्याच्या सावलीत उभ्या असलेल्या शेवटच्या माणसाच्या डोळ्यात अजूनही जर अन्यायाचे अश्रू असतील, एखाद्या मुलाच्या हातात पुस्तकाऐवजी मजुरीचे ओझे असेल, एखाद्या स्त्रीला समानतेसाठी संघर्ष करावा लागत असेल किंवा जात-पात आणि भेदभावाच्या भिंती समाजात उभ्या असतील, तर बाबासाहेबांनी दाखवलेल्या स्वातंत्र्याच्या अर्थाचा आपण अजून पूर्ण स्वीकार केलेला नाही.म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय स्वातंत्र्याच्या वाटचालीतील योगदान हे केवळ इतिहासाच्या पानांमध्ये शोधण्याचा विषय नाही; ते आजच्या भारताच्या सामाजिक विवेकाला प्रश्न विचारणारे आणि उद्याच्या भारताची दिशा ठरवणारे जिवंत विचारविश्व आहे. त्यांचे जीवन आपल्याला सांगते की, देश स्वतंत्र होण्यासाठी सत्ता बदलणे पुरेसे नसते; समाजाच्या मनातील गुलामगिरीची मानसिकता नष्ट होणे आवश्यक असते. बाबासाहेबांनी भारताला केवळ स्वातंत्र्याची स्वप्ने पाहायला शिकवले नाही, तर त्या स्वातंत्र्याला न्याय, समता आणि माणुसकीची दिशा दिली. म्हणूनच त्यांच्या योगदानाकडे पाहताना एका व्यक्तीचे चरित्र म्हणून नव्हे, तर भारतीय लोकशाहीच्या आत्म्याचा आणि सामाजिक मुक्तीच्या संघर्षाचा इतिहास म्हणून पाहणे अधिक आवश्यक ठरते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटिश सत्तेविरुद्ध राजकीय संघर्ष सुरू असताना भारतीय समाजाच्या अंतर्गत रचनेतही खोलवर विषमता होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सामाजिक वास्तवाकडे दुर्लक्ष केले नाही.

त्यांना स्वातंत्र्य हवे होते; पण असे स्वातंत्र्य हवे होते, ज्याचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल.परकीय सत्तेपासून मुक्त होणे आवश्यक होतेच; परंतु जातीय भेदभाव, अस्पृश्यता, सामाजिक अन्याय आणि मानवी अवमान यापासूनही मुक्त होणे तितकेच आवश्यक आहे, हा बाबासाहेबांच्या विचारांचा गाभा होता. म्हणूनच त्यांचा संघर्ष भारतीय स्वातंत्र्याच्या व्यापक अर्थाशी जोडलेला आहे.राजकीय स्वातंत्र्य म्हणजे देश स्वतंत्र होणे;सामाजिक स्वातंत्र्य म्हणजे माणूस स्वतंत्र होणे;आणि बाबासाहेबांचा आग्रह होता दोन्ही स्वातंत्र्ये एकमेकांपासून वेगळी करता येणार नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेचा अपमान केवळ पुस्तकातून वाचला नव्हता; त्यांनी तो स्वतःच्या आयुष्यात अनुभवला होता.शाळेत बसण्यापासून ते पाणी पिण्यापर्यंत, प्रवासापासून सामाजिक व्यवहारापर्यंत त्यांच्या जीवनात भेदभावाचे अनेक प्रसंग आले. पण या वेदनेसमोर ते झुकले नाहीत.एखादा सामान्य माणूस या अपमानाने खचला असता. मात्र बाबासाहेबांनी या वेदनेचे रूपांतर ज्ञान, संघर्ष आणि सामाजिक क्रांतीच्या ऊर्जेत केले.त्यांनी जगाला दाखवून दिले की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी शिक्षण, बुद्धी, आत्मविश्वास आणि संघटित संघर्ष यांच्या जोरावर इतिहासाची दिशा बदलता येते. त्यांचे जीवन म्हणजे एका व्यक्तीची यशोगाथा नाही; ते वंचितांच्या सामूहिक

आत्मसन्मानाच्या जागृतीचे पर्व आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला दिलेला संदेश खूप मोलाच आहे."शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" आजही तितकाच अर्थपूर्ण आहे.त्यांना माहिती होते की अज्ञानात ठेवलेला समाज आपल्या हक्कांसाठी लढू शकत नाही. म्हणून त्यांनी शिक्षणाला मुक्तीचे शस्त्र मानले.

त्यांच्या मते शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नव्हे. शिक्षण माणसाला प्रश्न विचारायला शिकवते. अन्याय ओळखायला शिकवते. स्वतःच्या अधिकारांची जाणीव करून देते. विवेक निर्माण करते आणि गुलाम मानसिकतेच्या बेड्या तोडते.आज देशातील लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अनेक वंचित कुटुंबांतील मुले डॉक्टर, अभियंते, शिक्षक, प्रशासक, संशोधक, उद्योजक आणि विविध क्षेत्रांत नेतृत्व करत आहेत. या परिवर्तनाच्या मुळाशी संविधानिक समानतेसोबतच बाबासाहेबांनी दिलेल्या शिक्षणाच्या विचाराची प्रेरणा आहे. महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा भारतीय सामाजिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे.प्रश्न केवळ पाण्याचा नव्हता.प्रश्न होता "सार्वजनिक पाण्यावर माणसाचा समान अधिकार का नसावा?"ज्या पाण्यावर समाजातील प्रत्येकाचा अधिकार असायला हवा, त्यासाठी वंचितांना संघर्ष करावा लागला, ही भारतीय समाजाच्या विषमतेची वेदनादायक वस्तुस्थिती होती.बाबासाहेबांनी हा संघर्ष उभा केला तो तहान भागवण्यासाठी नव्हे; आत्मसन्मानाची तहान भागवण्यासाठी.महाडच्या भूमीवरून त्यांनी भारतीय समाजाला सांगितले की सार्वजनिक संसाधनांवर कोणत्याही व्यक्तीचा जन्माधारित मक्तेदारीचा अधिकार असू शकत नाही.महाड येथे मनुस्मृती दहनाचा प्रसंग हा सामाजिक क्रांतीच्या इतिहासातील प्रतीकात्मक आणि वैचारिक घटना होती.या कृतीचा उद्देश कोणत्याही व्यक्तीविरोधात द्वेष निर्माण करणे नव्हता; तर जन्माधारित विषमता आणि अन्यायाला धार्मिक-सामाजिक वैधता देणाऱ्या विचारसरणीला आव्हान देणे हा होता.

बाबासाहेबांनी सांगितलेला संघर्ष हा व्यक्तीविरोधी नव्हता; तो अन्यायकारक व्यवस्थेविरोधी होता.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर देशासमोर सर्वात मोठे आव्हान होते नव्या राष्ट्राची लोकशाही रचना उभी करणे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेतील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते आणि मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी संविधान निर्मितीत ऐतिहासिक भूमिका बजावली.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला. स्वातंत्र्याचे संरक्षण केले. शोषणाविरुद्ध संरक्षण दिले. धार्मिक स्वातंत्र्याची हमी दिली. अस्पृश्यतेचे उच्चाटन केले आणि सामाजिक न्यायासाठी घटनात्मक मार्ग उपलब्ध करून दिला. यामुळे भारताचे स्वातंत्र्य केवळ राजकीय सत्ता हस्तांतरण राहिले नाही; त्याला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांची घटनात्मक दिशा मिळाली. ही बाबासाहेबांच्या कार्याची सर्वांत मोठी देणगी मानावी लागेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाचा विचार महिलांच्या अधिकारांपासून वेगळा नव्हता.महिलांना समान अधिकार मिळावेत, त्यांच्या जीवनात कायदेशीर सुरक्षितता असावी आणि कुटुंबव्यवस्थेत त्यांना न्याय मिळावा यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होता ज्या समाजात महिलेला समान स्थान नाही, तो समाज खऱ्या अर्थाने प्रगत होऊ शकत नाही.आज मुली शिक्षण घेत आहेत, विविध क्षेत्रांत नेतृत्व करत आहेत. या परिवर्तनामागे संविधानाने दिलेल्या समानतेच्या अधिकाराची मोठी शक्ती आहे.

कामगार, शेतकरी आणि आर्थिक न्याय,बाबासाहेबांचा संघर्ष केवळ जातीय प्रश्नांपुरता मर्यादित नव्हता.

कामगारांचे प्रश्न, कामाचे तास, सामाजिक सुरक्षा, औद्योगिक विकास, आर्थिक नियोजन, पाणी आणि शेतीसंबंधी धोरणात्मक विचार यांसारख्या विषयांवरही त्यांनी गंभीर भूमिका मांडली.

त्यांना विकास हवा होता; पण असा विकास जो मानवकेंद्री असेल. मोठमोठे रस्ते,मोठमोठ्या इमारती उभ्या राहिल्या आणि गरीब माणूस उपाशी राहिला, तर त्या विकासाची नैतिकता काय?

अर्थव्यवस्था वाढली आणि रोजगार, शिक्षण व आरोग्याच्या संधी काहींच्याच वाट्याला आल्या, तर सामाजिक न्याय कुठे आहे?

हा प्रश्न आजही आपल्यासमोर उभा आहे.डॉ. बाबासाहेबांना एका विशिष्ट समाजाच्या चौकटीत बंदिस्त करणे ही त्यांच्या व्यापक विचारांची मर्यादा ठरवणे होय.

त्यांनी वंचितांसाठी संघर्ष केला, कारण वंचितांचा प्रश्न हा भारतीय लोकशाहीच्या नैतिकतेचा प्रश्न होता.आज देशातील कोणताही नागरिक शिक्षण घेतो, नोकरी करतो, निवडणूक लढवतो, मतदान करतो, न्यायालयात न्याय मागतो किंवा आपल्या अधिकारांसाठी आवाज उठवतो तेव्हा संविधानिक लोकशाही त्याच्या पाठीशी उभी असते.

म्हणून बाबासाहेबांचे योगदान एका समाजाचे नव्हे, तर भारतीय लोकशाहीचे आहे.

स्वातंत्र्याला अनेक दशके झाली. देशाने प्रचंड प्रगती केली. परंतु आजही काही प्रश्न आपल्यासमोर आहेत.शिक्षणातील असमानता, आर्थिक विषमता, सामाजिक भेदभाव, बेरोजगारी, ग्रामीण-शहरी दरी, महिलांवरील अन्याय, डिजिटल दरी आणि संधींची असमान उपलब्धता ही आव्हाने अजूनही पूर्णपणे संपलेली नाहीत.

म्हणून बाबासाहेबांचा संघर्ष इतिहासाच्या पानांमध्ये बंद करण्याची वेळ आलेली नाही.

तो संघर्ष आज आपल्या कृतीतून पुढे नेण्याची वेळ आहे.एखाद्या गरीब विद्यार्थ्याला शिक्षणासाठी मदत करणे, वंचित मुलाला पुस्तक देणे, वृद्धाला आधार देणे,महिलेला सुरक्षित वातावरण देणे, भेदभावाविरुद्ध आवाज उठवणे, संविधानिक मूल्यांचे पालन करणे हीच आजच्या काळातील सामाजिक चळवळ आहे.

एक काळ असा होता, जेव्हा समाजातील काही मुलांना शिक्षणाचा अधिकारही नाकारला जात होता.आज त्याच देशातील वंचित समाजातील मुले विद्यापीठात जात आहेत, संशोधन करत आहेत, प्रशासनात प्रवेश करत आहेत, विज्ञान-तंत्रज्ञानात योगदान देत आहेत, साहित्य निर्माण करत आहेत, उद्योग उभारत आहेत आणि देशाच्या विकासात सहभागी होत आहेत.

या परिवर्तनाच्या प्रवासात बाबासाहेबांच्या विचारांचा प्रकाश आहे.म्हणूनच बाबासाहेबांचे जीवन आपल्याला एक मोठा संदेश देते परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षणाची ज्योत विझू देऊ नका.अन्याय कितीही मोठा असला तरी संघर्षाची भाषा विसरू नका.सत्ता कितीही शक्तिशाली असली तरी संविधानिक मार्ग सोडू नका.आणि माणूस कितीही वेगळा दिसत असला तरी त्याच्यातील माणुसकी कधीही विसरू नका. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा एका राष्ट्राची बेडी तुटली; पण बाबासाहेबांनी आयुष्यभर प्रयत्न केला की माणसाच्या मनातील गुलामगिरीची बेडीही तुटावी.

त्यांनी वंचितांच्या हातात दगड दिला नाही; पुस्तक दिले.त्यांनी द्वेष शिकवला नाही; हक्कांची जाणीव शिकवली.त्यांनी हिंसेचा मार्ग दाखवला नाही; संविधानाचा मार्ग दाखवला.त्यांनी समाजाला फोडण्याऐवजी समता आणि बंधुतेच्या आधारावर समाज उभारण्याचे स्वप्न पाहिले.आज भारत जगातील मोठ्या लोकशाही राष्ट्रांपैकी एक आहे. या लोकशाहीची ताकद केवळ संसद भवनात नाही; ती देशातील सर्वसामान्य नागरिकाच्या अधिकारांमध्ये आहे.म्हणून आजच्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण तिरंग्याला सलाम करताना भारतीय संविधानाच्या मूल्यांना देखील सलाम करूया.ज्या हातांनी कधी विहिरीवरचे पाणीही सहज मिळवू शकले नाही, त्या हातात आज शिक्षणाचे पुस्तक असावे.ज्या डोळ्यांना कधी मंदिराचे दरवाजे बंद दिसले, त्या डोळ्यांसमोर आज समानतेचे आकाश असावे.ज्याचा आवाज वर्षानुवर्षे दाबला गेला, त्या माणसाला आज लोकशाहीच्या विचारमंचावर समान आवाज मिळावा.आणि भारताच्या प्रत्येक नागरिकाच्या मनात एकच भावना असावी "मी या देशाचा समान नागरिक आहे. माझा जन्म माझी किंमत ठरवत नाही; माझे कर्तृत्व, माझी माणुसकी आणि माझे नागरिकत्व माझी ओळख आहे."

ही भावना ज्या दिवशी भारताच्या प्रत्येक घरात पोहोचेल,त्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार होण्याच्या दिशेने भारताने एक मोठे पाऊल टाकले असेल.

स्वातंत्र्याच्या सूर्याला सामाजिक न्यायाची दिशा देणाऱ्या या महामानवाला कोटी कोटी प्रणाम!

लेखक हे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त आहेत.

समाजभूषण रामदास वच्छलामाई
रखमाजी वाघमारे ; छत्रपती संभाजीनगर
मो.नं.8888125610

# !!स्वातंत्र्यपूर्व...भारताचे "अंतरंग"!!

आज स्वातंत्र्य मिळुन सात दशकांचा काळ लोटलेला आहे. १४ ऑगस्ट १९४७ ती रात्र भारताच्या पंडीत जवाहरलाल नेहरूनी सर्व भारतीयांना उद्देशून भाषण केले. त्यावेळी नेहरू म्हणाले सारं जग झोपलेलं आहे आज मध्य रात्री नंतर भारताच्या स्वातंत्र्याची खऱ्या अर्थानी पहाट होणार आहे. सर्व भारतीयांना स्वातंत्र्याच्या खुप... खुप शुभेच्छा.

स्वातंत्र्य मिळुन आज सत्तरवर्षे होऊन गेली. भारतदेश हा सर्वात मोठा लोकतांत्रिक देश म्हणून भारतानी आपली मान उंचावलेली आहे. सर्व जगाचा विचार केला तर अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा, वेशभुषा, आपली परंपरा, आचार विचार जपणारा देश म्हणजेच आपला भारत देश असं अभिमानानी प्रत्येकांनी सांगावयास हवं इतका सुंदर देश म्हणजेच आपला भारत देश.

महात्मा गांधीजीनी आपल्या देशाला अंहिसा आणि शांतीच्या मार्गाचा आवलंब करून स्वातंत्र मिळवुन दिले. अगणीत शुर वीरांनी या धगधगत्या स्वातंत्र्य कुंडात आपले बलिदान दिले. असंख्य स्वातंत्र्य सेनानीच्या अविरत परिश्रमाची फलश्रुति म्हणजे आजचे हे स्वातंत्र्य अशांच्या बलिदानाला, आत्मसर्मपणाला, त्यांच्या त्यागाला आहुतीला अंतःकरणा पासुन स्मरण करून त्यांना आदरांजली वाहण्याचा दिवस म्हणजेच स्वातंत्र दिन.

साधारणता १९४५ चा ऑगस्ट महिना दुसरे महायुध्द थांबले. इंग्लडचा या युध्दात विजय झाला पण त्यांची मनुष्यहानी, आर्थिक हानी खूप मोठ्या प्रमाणावर झाली. नी त्याचाच परिणाम त्यांची भारतीय सैन्य नी भारत देशावरील पकड सैल झाली. त्यातुनच ब्रिटीश राज्यकर्त्यांनी भारतातुन काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला. तशातच इंग्लंडमध्ये निवडणुका होऊन विन्स्टन चर्चिल पराभुत होवून क्लेमंट अॅटली यांच्या मजूर पक्षाचे सरकार सत्येवर आले. १९४६ मध्ये त्यांनी त्रिमंत्री मंडळ भारतात वाटाघाटी करण्यासाठी पाठविले.

त्रिमत्री मंडळाच्या सुचनेनुसार संविधान समिती स्थापना केली गेली. १९४६ जुलैला भारतात सार्वत्रिक निवडणुक होऊन संविधान समितीला प्रचंड बहुमत मिळाले. मात्र या संविधान समितीत मुस्लिम लीगने सहभागी होण्यास नकार दिला. १६ ऑगस्ट १९४६ ला या लिगच्या अनुयायांनी लुटालुट, जाळपोळ, सशस्त्र हल्ले सुरु केले. बंगालच्या नो आखालीच्या भागात तर राक्षसी हिंसाचार झाले. तीन दिवसात चार हजार लोक मृत्युमुखी पडले.

याची पंच्याहत्तरीत असणारे महात्मा गांधीने आपल्या वयाचा विचार न करता हिंसाचार मिटविण्यासाठी मोठ... मोठ्या पदयात्रा काढून लोकांची मने शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रथोभ वाढत होता. देशात मोठ्या प्रमाणवर हिंसाचार वाढला होता. अशा वेळी गव्हर्नर जनरल लॉर्ड वेव्हेल यांनी भारतात हंगामी सरकारची स्थापना करून पंडित जवाहरलाल नेहरूच्या मंत्रिमंडळाच्या हाती भारताच्या राजकारणाची हंगामी सरकार म्हणून सारी सुत्रे दिली. सुरुवातीला मुस्लिम लीग सरकारात सामील झाली नाही. नंतर मात्र सहभागी झाली. भारतावरील ब्रिटीशांचा ताबा हा जून १९४८ पूर्वी सोडून देईल असे ब्रिटीश पंतप्रधान अॅटली यांनी जाहिर केले. सर्व सुत्रे भारतीयांच्या हाती सोपविण्यासाठी भारताचे नवे गव्हर्नर जनरल म्हणून मार्च १९४७ मध्ये लॉर्ड लुई माउंट बॅटन यांची नियुक्ति करण्यात आली.

लॉर्ड माउंट बॅटन यांनी गव्हर्नर पदाची सुत्रे हाती घेतल्यावर भारतातील सर्व प्रमुख नेत्यांशी बोलणी चर्चा विचार विनिमय करून भारताची फाळणी करून भारत आणि पाकिस्तान अशा दोन स्वतंत्र राष्ट्रांची निर्मितीची योजना तयार करून सर्वांच्या स्विकृतिसाठी सर्वांसमोर ठेवली. राष्ट्रीय सभेचा मुळ आधार होता तो देशाच रैक मात्र मुस्लिम लिगनी पाकिस्तान निर्मितीचा अट्टाहास धरला. देशात हिंसाचाराचे थैमान वाढले राष्ट्रीय सेनेला राष्ट्रीय ऐक देशाचे एक संघ राहण्याचा विचार सोडावा लागला. फाळणी शिवाय देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही त्यामुळेच नाइलाजाने देशाच्या फाळणीचा विचार राष्ट्रीय सभेला मान्यच करावा लागला. लॉर्ड माउंटबॅटन योजनेच्या आधाराद्वारे भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटीश पार्लमेंटने मंजुर केला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचे विभाजन होवून भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र्य राष्ट्र उदयास आली. त्यानंतर ब्रिटीश पार्लमेंटचा आता कोणताही अधिकार राहणार नाही अशी कायद्यात तरतुदही करण्यात आली.

नवी दिल्लीच्या संसद भवनाच्या भव्य सभागृहात १४ ऑगस्टच्या रात्री संविधान समितीची बैठक सुरु होती. मध्यरात्रीचे बाराचे ठोके पडले आणि भारताचे पारतंत्र्य संपले. भारत देश स्वतंत्र झाला. ब्रिटीशांचा युनियन जॅक खाली उतरविण्यात आला. त्याच्या जागी भारताचा तिरंगी ध्वज फडकविण्यात आला. या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधत भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी प्रभावी भाषण केले. अशा या मंगल क्षणाची आठवण केवळ भारतीयांच्याच नव्हे तर मानवजातीच्या सेवेला वाहून घेण्याची शपथ साऱ्यानी घ्यावी असे आवाहन केले.

स्वातंत्र्याच्या या सोहाळ्याचा अभूतपूर्व सोहाळ्याचा आनंद साऱ्यानी अनुभवीला पण तो आनंद निर्मळ नव्हता. कारण या स्वातंत्र्याच्या मागे देशाची फाळणी झालेली होती नी त्यानंतर उसळलेल्या हिंसाचारामुळे अख्खा देश पार होरपाळुन निघालेला होता. त्यामुळे आम जनता ही खूप दुःखी झालेली होती. महात्मा गांधी या आनंद सोहाळ्याचा आनंद घेण्यासाठी दिल्लीत थांबले नाहीत. शांतता जातीय सलोख टीकविण्यासाठी ते बंगाल मध्ये झटत होते. पण स्वातंत्र्य मिळाल्या नंतर केवळ सहा महिन्यातच ३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसेनी महात्मा गांधीजीची हत्या केली. स्वातंत्र्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या महात्म्याला या महामानवाला शेवटी आपल्या जीवाचे मोल द्यावे लागले. ही फार मोठी किंमत त्यांना द्यावी लागली या पेक्षा मोठं दुदैवच नाही.

भारतास स्वातंत्र्य मिळाले पण त्याला प्रजासत्ताक राष्ट्र बनविण्यासाठी भारतीय संविधान तयार करण्याचे काम संविधान समितीने १९४७ साली सुरु केले. या संविधान समितीत डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल श्याम प्रसाद मुखर्जी यांच्या सारखे ज्येष्ठ राष्ट्रीय पुढारी तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बॅरीस्टर जययकर यांच्या सारखे प्रख्यात कायदे पंडित त्याच प्रमाणे सरोजिनी नायडू, हंसाबेन मेहता यांच्या सारख्या कर्तबगार महिलांचाही सहभाग होता. संविधान समितीने तयारक लेले हे संविधान २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आले. ब्रिटीश साम्राज्यवादाच्या विरूध्द लढताना स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता आणि लोकशाही अशा बहुमूल्य मूल्यांवरील निष्ठा भारतीय जनतेनी उराशी बाळागलेल्या होत्या. अश मूल्यांच्या पायावरच भारतीय संविधानाची उभारणी केली गेलेली आहे.

भारत स्वतंत्र झाला तो प्रजासत्ताकही झाला मात्र देशात असणाऱ्या संस्थानांना भारतात सामील होणेच त्यांच्या हिताचे आहे असे त्यावेळी असणारे गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांनी त्यांना पटवुन दिल्यावर जूनागड, हैद्राबाद व काश्मीर सोडून सर्व संस्थाने १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीच भारतात विलिन झाली. जूनागडचा नवाब मात्र पाकिस्तानात सामील होणार होता पण प्रजेनी प्रचंड विरोध केल्यानं तो फेब्रुवारी १९४८ मध्ये भारतात विलीन झाला. काश्मीर संस्थानाचा राजा हरीसिंग याने स्वतंत्र रहाण्याचा निर्णय घेतला. मात्र काश्मीर पाकिस्तानात सामील करून घेण्याचा पाकिस्तानचा मानस होता. त्यासाठी पाकिस्तान हरीसिंग यांचेवर दडपण आणू लागले. ऑक्टोबर १९४७ मध्ये तर पाकिस्तानच्या चिथावणीने सशस्त्र घुसखोरांनी काश्मिरवर हल्ला केला. तेव्हा मात्र हरीसिंगाने भारतात सामील होणच्या करारावर स्वाक्षरी केली. हरीसिंगाचे काश्मीर संस्थान भारतात विलिन झाल्यावर भारतीय लष्कर काश्मीरच्या रक्षणासाठी पाठवले गेले. भारतीय लष्कराने काश्मीरचा खूप मोठा भाग घुसखोरांच्याहातुन परत मिळविला मात्र थोडासा भाग मात्र पाकिस्तानच्या ताब्यात राहुन गेला.

इतर साारे संस्थानीक भारतात विलिन झाले मात्र हैद्राबादच्या निजामातस पाकिस्तानची फुस होती. त्यामुळे तो विलिन होण्यास तयार नव्हता. कासीम रझवी यांनी रझाकाराच्या पाठीव्यांवर संघटना उभी केली. त्यांच्या साथीदारानी हिंदूवरच अत्याचार सुरु केले. हैद्राबाद मुक्तिसंग्रामाची मोठी चळवळ उभी केली गेली. स्वामी रामानंद तिर्थ, गोविंदराव नानल, रामलिंग स्वामी, गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव, दिगंबरराव बिंदू यांची चळवळ प्रखर झाली. रझाकाराची लुटालुट, जाळपोळ सुरु झाल्यावर जनतेनीही शस्त्रे हाती घेतली. अखेरीस १३ स्पटेंबर १९४९ रोजी भारत सरकारनेच निजामा विरूध्द पोलीस कारवाई केल्यावर निजाम तीन दिवसात शरण आला. हैद्राबाद संस्थाने भारतात विलीन झाले.

भारत स्वतंत्र झाल्यानंतरही कांही भाग फ्रान्स पोर्तुगाल यांच्या ताब्यात होते. चंदननगर, पुदुच्चेरी, कारिकल, माहे, याणम, यावर फ्रान्सचे तर गोवा, दीव, दमण, दादरा आणि नगर हवेली यांवर पोर्तुगालचे अधिपत्य होते. १९४९ मध्ये फ्रान्सने सार्वमत घेवुन चंदनगर आणि इतर प्रदेश भारताच्या हाती सोपवले. पोर्तुगालने मात्र त्यांच्या ताब्यातील प्रदेश सोडण्यास नकार दिल्यावर डॉ.टी. बी. कुन्हा यांनी आपल्या लेखणीतुन पोर्तुगिज शोषण करणाऱ्या कारभारावर कोरडे ओढले. १९४६ साली गोवा मुक्तीसाठी डॉ. राम मनोहर लोहिया यांनी सत्याग्रहाची चळवळ सुरु केली. १९५४ साला पासुन गोवा मुक्तीला तर विशेष गती दिली गेली आणि त्यांच्या दोन तुकड्या गोव्यात पाठविल्या गेल्या. त्यामध्ये सेनापती बापट, महादेवशास्त्री जोशी व त्यांच्या पत्नी सुधाताई जोशी, सुधीर फडके, नाना साहेब गोरे, मोहन रानडे अशा सत्याग्रहीनी आपले अंदोलन प्रखर केले. डिसेंबर १९६१ साली गोठ्यात सैन्यानी कारवाई केली नी लष्करासमोर पोर्तुगीजांनी शरणागती पत्करली. गोवा मुक्त झाला. भारताच्या भूमीवरून साम्राज्यावादाची संपूर्ण जळमट दूर झाली. स्वच्छ सुन्दर स्वतंत्र भारताचं दर्शन साऱ्या जगताला झालं. स्वातंत्र्यपूर्वीचा हा पूर्वरंग फारच खडतर, अंधकारमय नी क्लेशकारक होता. अगणीत जणांच्या बलीदानाच्या आहुती नंतर आपण आज हे स्वातंत्र्याचे सुखद क्षण अनुभवित आहोत, हीच खरी आपल्या स्वातंत्र्याची फलश्रुती आहे, असचं म्हणाव लागेल... हो ना !

**सुधीर कोर्टीकर**
**जुई अपार्टमेंट, बी-६, तिरूपती पार्क,गुरूसहानी नगर, एन-४, सिडको,छत्रपती संभाजी नगर**
**मो. ९७६५५५३३१२**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# शास्त्रीय तंत्रज्ञानाचा अवलंब करून बदलत्या हवामानात शेतीचे नियोजन करा — कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधि

**परभणी :**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या प्रेरणेतून तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली मागील तीन वर्षांपासून 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासोबत' हा अभिनव कृषि विस्तार उपक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यात थेट संवाद साधण्यासाठी शेतकरी-शास्त्रज्ञ चर्चासत्रे, प्रक्षेत्र भेटी, कृती प्रात्यक्षिके आणि शेतकरी मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजी हा उपक्रम विविध गावांमध्ये उत्स्फूर्त प्रतिसादात राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत विद्यापीठाच्या १४ चमूंमधील ४४ शास्त्रज्ञांनी विविध गावांमध्ये भेटी देऊन सुमारे ५२५ हून अधिक शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी खरीप पीक व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, नैसर्गिक व एकात्मिक शेती, कृषिपूरक व्यवसाय, आहार व पोषण तसेच कृषि तंत्रज्ञानाच्या विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

या उपक्रमांतर्गत परभणी जिल्ह्यातील देऊळगाव दुधाटे (ता. पूर्णा) येथे आयोजित कार्यक्रमास ५२ शेतकरी उपस्थित होते. यावेळी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी ऑनलाइन पद्धतीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, चालू हंगामात सुदैवाने एल निनोचा फार मोठा परिणाम जाणवला नाही. पाऊस काही प्रमाणात कमी असला तरी उपलब्ध पाऊस पिकांच्या वाढीसाठी उपयुक्त ठरत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप पिकांचे योग्य नियोजन करून शास्त्रीय पद्धतीने पिकांचे व्यवस्थापन करावे, असे आवाहन त्यांनी केले. ते पुढे म्हणाले की, चांगला शेतकरी असेल तरच तो चांगला कृषि शास्त्रज्ञ होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या पाल्यांना कृषि शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करावे. भविष्यात अधिकाधिक सक्षम कृषि शास्त्रज्ञ निर्माण झाल्यास मराठवाड्यातील शेतीच्या विकासाला निश्चितच चालना मिळेल. बदलत्या हवामान परिस्थितीत विद्यापीठातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन शास्त्रीय तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास शेतीमध्ये चांगले उत्पादन घेणे शक्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे यांनी शेतकऱ्यांना विद्यापीठाने विकसित केलेल्या विविध कृषि तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. विद्यापीठाच्या शिफारशी व तंत्रज्ञानाचा योग्य पद्धतीने वापर केल्यास उत्पादनवाढ साध्य करता येते, असे त्यांनी सांगितले. तसेच येत्या १५ ऑगस्ट रोजी विद्यापीठात महाराष्ट्र राज्याचे माननीय कृषि मंत्री नामदार श्री. दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत आयोजित कृषि मेळाव्यास सर्व शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

शेतकऱ्यांनी केलेल्या नावीन्यपूर्ण कृषि प्रयोगांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील असून, यासाठी लवकरच काही संस्थांसोबत सामंजस्य करार (MoU) करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. राकेश अहिरे यांनी दिली. शेतकऱ्यांच्या नवकल्पनांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास त्यांचा इतर शेतकऱ्यांमध्येही प्रसार होऊन कृषि क्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख यांनी विद्यापीठामार्फत सुरू असलेल्या व्हॉट्सॲप हेल्पलाइनची माहिती शेतकऱ्यांना दिली. शेतीविषयक समस्या उद्भवल्यास विद्यापीठातील तज्ज्ञांशी संपर्क साधून मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यापीठाच्या विविध समाजमाध्यमांद्वारे उपलब्ध होणाऱ्या कृषि तंत्रज्ञानविषयक माहितीचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.



विस्तार कृषि विद्यावेत्ता डॉ. गजानन गडदे यांनी हळद, कापूस व ऊस पिकांतील खत व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पिकांची गरज, जमिनीची सुपीकता आणि पिकाची अवस्था लक्षात घेऊन खतांचा संतुलित वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कीटकशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर पटाईत यांनी सोयाबीन पिकावरील येलो मोझॅक, हळद पिकावरील कंदमाशी तसेच उसावरील पाकोळी किडीचे व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती दिली. किडी व रोगांचा प्रादुर्भाव झालेल्या शेतांमध्ये एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विस्तार शिक्षण तज्ज्ञ डॉ. सुनीलदत्त जक्कावाड यांची उपस्थिती होती.

विविध जिल्ह्यांमध्ये उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सय्यदपूर येथे मार्गदर्शन व प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले. बीड जिल्ह्यातील बोरखेड, पाचेगाव, चुंबळी व तळे पिंपळगाव येथे मार्गदर्शन, चर्चासत्रे व प्रक्षेत्र भेटी घेण्यात आल्या. या कार्यक्रमांना एकूण ८२ शेतकरी उपस्थित होते.

जालना जिल्ह्यातील शेवगा, ता. अंबड येथे ४७ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला. लातूर जिल्ह्यातील उटी खुर्द येथे खरीप पीक व्यवस्थापनावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले असून ६२ शेतकरी उपस्थित होते.

अंबाजोगाई तालुक्यातील कुंभेफळ व श्रीपतरायवाडी येथे सोयाबीन पिकातील कीड नियंत्रण तसेच एकात्मिक शेती पद्धतीविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमात तीन अधिकारी आणि ८० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

याशिवाय वैजापूर तालुक्यातील शिऊर बंगला येथे डाळ मिल, प्रमुख पिके व किडींचे व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नांदेड जिल्ह्यातील बोथी येथे प्रमुख पिके व किडींचे व्यवस्थापन, तर सिल्लोड तालुक्यातील वरखेडी येथे आंबा बागेला भेट देऊन केसर आंब्याच्या गुणवत्तेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

लातूर जिल्ह्यातील माळी हंडरगुळी येथे एकात्मिक शेती पद्धतीची पाहणी करून एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन तसेच पीक पद्धतीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. परभणी येथील सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने सनपुरी येथे पावसाळ्यातील आहार तसेच शेती कामात सामाजिक माध्यमांचा वापर यावर मार्गदर्शन करण्यात आले.

हिंगोली जिल्ह्यातील माथा येथे हळद व सोयाबीन पिकांबाबत मार्गदर्शन, जालना जिल्ह्यातील गेवराई येथे प्रक्षेत्र भेट व मार्गदर्शन, तसेच कृषि विज्ञान केंद्र, परभणीच्या वतीने पालम येथे नैसर्गिक शेती, पोषणातून शेती आणि कृषिपूरक व्यवसायांच्या माध्यमातून उद्योजकता विकास या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

विविध केंद्रे व महाविद्यालयांचा व्यापक सहभाग

विद्यापीठाच्या विविध विस्तार शिक्षण केंद्रे, कृषि विज्ञान केंद्रे, संशोधन केंद्रे तसेच महाविद्यालयांच्या संयुक्त सहभागातून या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठातील विविध अधिष्ठाता, प्राचार्य, शास्त्रज्ञ, कृषि तज्ज्ञ आणि विस्तार कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवून शेतकरी-केंद्रित तंत्रज्ञान व मार्गदर्शन प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी योगदान दिले.

कृषि विज्ञान केंद्र, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथून डॉ. दिप्ती पाटगावकर, डॉ. बस्वराज पिसुरे आणि डॉ. संजुला भावर यांनी सहभाग घेतला. कृषि विज्ञान केंद्र, खामगाव येथून डॉ. हनुमान गरुड व डॉ. तुकेश सुरपाम, तर कृषि विज्ञान केंद्र, बदनापूर येथून डॉ. आर. एल. कदम व डॉ. एस. आर. धांडगे यांनी सहभाग नोंदविला.

विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्र, लातूर येथून विस्तार कृषि विद्यावेत्ता डॉ. वसंत सूर्यवंशी, तसेच कृषि महाविद्यालय, लातूरचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. दिगंबर पेरके यांच्यासह डॉ. ज्योती देशमुख, डॉ. अनंत शिंदे आणि डॉ. दयानंद मोरे यांनी सहभाग घेतला.

विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्र, अंबाजोगाई येथून विस्तार कृषि विद्यावेत्ता प्रा. अरुण गुट्टे आणि तालुका कृषि अधिकारी श्री. विजय पवार यांनी सहभाग घेतला.

विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्र व राष्ट्रीय कृषि संशोधन केंद्र, छत्रपती संभाजीनगर तसेच कृषि महाविद्यालय, लिहाखेडी यांच्या वतीने संशोधन उपसंचालक डॉ. सूर्यकांत पवार आणि डॉ. ज्ञानेश्वर मुटकुळे यांनी सहभाग नोंदविला. फळ संशोधन केंद्र येथून प्रभारी अधिकारी डॉ. संजय पाटील यांनी सहभाग घेतला.

कापूस संशोधन केंद्र, नांदेड येथून प्रभारी अधिकारी डॉ. विजयकुमार चिंचाने, डॉ. बस्वराज भेदे आणि डॉ. अरविंद पांडागळे यांनी सहभाग घेतला. गळीत धान्य संशोधन केंद्र येथून प्रभारी अधिकारी डॉ. मोहन धुपे, डॉ. शिवशंकर पोले, डॉ. अशोक घोटमुकुले आणि श्रीमती पौर्णिमा सिरसाठ यांनी सहभाग नोंदविला.

सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, परभणी येथून सहयोगी अधिष्ठाता डॉ. नीता गायकवाड आणि विभागप्रमुख डॉ. शंकर पुरी यांनी सहभाग घेतला. कृषि महाविद्यालय, गोळेगाव येथून सहयोगी अधिष्ठाता डॉ. शिवाजीराव शिंदे, डॉ. डी. एच. सारंग, कृषि विद्यावेत्ता डॉ. आर. एस. जाधव आणि डॉ. व्ही. एस. मनवर यांनी सहभाग घेतला.

कृषि महाविद्यालय, बदनापूर येथून सहयोगी अधिष्ठाता डॉ. डी. के. पाटील, डॉ. एन. डी. देशमुख, डॉ. ए. एल. सुरडकर आणि डॉ. एस. व्ही. पवार यांनी सहभाग घेतला. तसेच कृषि विज्ञान केंद्र, परभणी येथून अरुणा खरवडे यांनी सहभाग नोंदविला.

या व्यापक सहभागामुळे विद्यापीठाच्या विविध केंद्रांमार्फत उपलब्ध असलेले कृषि तंत्रज्ञान, संशोधनाधारित माहिती आणि शेतकरी मार्गदर्शन अधिक प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास मदत झाली. विद्यापीठातील विविध विभाग, कृषि विज्ञान केंद्रे आणि संशोधन संस्थांमधील समन्वयातून शेतकरी-केंद्रित विस्तार कार्याला अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून अधोरेखित झाला.

'माझा एक दिवस माझ्या बळीराजासोबत' या उपक्रमामुळे विद्यापीठातील शास्त्रज्ञ आणि शेतकरी यांच्यात थेट संवादाचे प्रभावी व्यासपीठ निर्माण झाले असून, शेतकऱ्यांच्या स्थानिक गरजा व समस्यांनुसार तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध होत आहे.

# मातंग विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांचे नि: शुल्क पूर्व प्रशिक्षण

## ऑनलाईन अर्ज करण्याचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :- महाराष्ट्र शासनाच्या अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई मार्फत राज्यातील मातंग व तत्सम जातींमधील विद्यार्थ्यांसाठी युपीएससी, एमपीएससी, बँकिंग, पोलीस व सैन्य भरती यांसारख्या विविध स्पर्धा परीक्षांचे नि:**शुल्क पूर्व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या योजनेचा जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुनील वारे यांनी केले आहे.

दिल्ली व महाराष्ट्रातील नामांकित संस्थांमध्ये प्रशिक्षण

**महाराष्ट्र राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांसाठी युपीएससी (UPSC), एमपीएससी (MPSC), महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES), न्यायिक सेवा (JMFC), एसएससी (SSC), आयबीपीएस (IBPS), रेल्वे, एलआयसी (LIC), नाबार्ड तसेच पोलीस व सैन्य भरती या स्पर्धा परीक्षांसाठी ६ ते ११ महिने कालावधीचे नि:**शुल्क पूर्व प्रशिक्षण खाजगी नामांकित व्यावसायिक संस्थांमार्फत ऑफलाईन दिले जाणार आहे. हे अनिवाशी प्रशिक्षण दिल्ली व महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर उपलब्ध असेल.

**विद्यावेतन व शैक्षणिक साहित्यासाठी आर्थिक मदत:**

प्रशिक्षण कालावधीत विद्यार्थ्यांची आर्थिक अडचण भासू नये म्हणून दरमहा १०,००० ते १३,००० रुपये विद्यावेतन (Stipend) दिले जाणार आहे. याशिवाय पुस्तकांचा संच आणि इतर अनुषंगिक खर्चासाठी एकरकमी १३,००० ते १८,००० रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

**पात्रता आणि निवड प्रक्रिया:**

अनुसूचित जातीतील मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग- म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग- गारोडी, मांग- गारुडी, मादगी व मादिगा या समाजातील पदवीधर उमेदवार या योजनेसाठी पात्र आहेत. त्यांनी ऑनलाईन अर्ज केल्यानंतर प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड सामयिक प्रवेश परीक्षेद्वारे (CET) गुणवत्तेनुसार केली जाईल.

**असा करा अर्ज:**

**पात्र उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळ** http://arti-cet2026.cbtexam.in ला भेट देऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष धोरणानुसार टीआरटीआय संस्थेमार्फत राज्यातील सर्व संशोधन व प्रशिक्षण संस्थांच्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमांचे संनियंत्रण व अंमलबजावणी केली जाणार असल्याचे श्री. सुनील वारे यांनी सांगितले.

अर्जाचा दिनांक

**अर्ज सुरु करण्याचा दिनांक:** ०९/०८/२०२६

**अर्ज करण्याचा अंतिम दिनांक:** २३/०८/२०२६

# 21 ऑगस्ट हा दरवर्षी "जलसंधारण दिन" म्हणून राज्यात साजरा करण्यात येणार

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :-**सन २०२६ साठी शासनाने जलसंधारण दिनासोबतच "जलसंधारण सप्ताह" व "जलसंधारण अभियान" राबविण्यास मान्यता मंत्रिमंडळात मिळाली असून, युवा पिढीचा सहभाग वाढविण्यासाठी व क्षेत्रिय स्तरावर नियोजनबद्ध कार्यक्रम राबविण्यासाठी अतिरिक्त सूचना निर्गमित केल्या आहेत. कृपया 15 ऑगस्ट ते 21 ऑगस्ट या "जलसंधारण सप्ताह" मध्ये सर्वांनी सहभाग नोंदवावा. दि. 21-08-2026 रोजी सकाळी महा- वाकेथाण चे आयोजन केले आहे. आणि Reel competition चे आयोजन केलेले आहे. खालील QR Code scan करून आपण आपला सहभाग नोंदवावा आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत QR code पोहचावा. जेणेकरून दि. 21-08-2026 रोजी जास्तीत जास्त लोक महा- वाकेथाण मध्ये सहभाग घ्यावे

# भारतीय स्वातंत्र्य दिन 15 ऑगस्ट साजरा होणार : गौरक्षक सेना महाराष्ट्र

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

सप्तश्रृंगी पान मंदिर वसमत रोड परभणी येथे गौरक्षक सेना महाराष्ट्राच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य दिन 15 ऑगस्ट 2026 त्यानिमित्ताने हरघर तिरंगा हर घर तिरंगा झेंडा ध्वज भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाच्या अनुषंगाने या ठिकाणी भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात येणार आहे या मागील 30-35 वर्षापासून झेंडावंदन साजरा करणारे कार्यक्रमाचे आयोजक गौरक्षक सेना मराठवाडा प्रचारक योगगुरू चंपालाल देवतवाल ठाकूर यांच्या पुढाकारातून आयोजन करण्यात आले आहे प्रमुख अतिथी म्हणून गौरक्षक सेना महाराष्ट्र मराठवाड्याचे वरिष्ठ उपाध्यक्ष 1008 महामंडलिकेश्वर डॉ. सचितानंद सरस्वती स्वामी अशोक महाराज पवार व आयुर्वेदिक नाडी तज्ञ डॉ. गोविंद कामटे अँड निवृत्ती कदम गो उत्पादन विक्रेते प्रसाद लोंढे सर्व गोसेवक गोरक्षकांनी गो प्रेमी गोभक्त व सामाजिक अध्यात्मिक धार्मिक उपस्थित राहावे सकाळी साडेसात वाजता सप्तशृंगी पान मंदिर वसमत रोड परभणी येथे स्वतंत्र्य दिन साजरा करण्यासाठी असे आव्हान कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष गौरक्षक नितीन जाधव गोगलगावकर अशी माहिती गौरक्षक सेना महाराष्ट्र प्रदेश मंत्री गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

# जिल्ह्यात 850 ठिकाणी 'आपले सरकार सेवा केंद्र' स्थापन करण्यासाठी अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर, दि.१४ (जिमाका)- : जिल्ह्यातील तालुके, नगर परिषद, नगर पंचायत व ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करावयाचे आहेत. त्यासाठी शहरी भागात १८५ आणि ग्रामीण भागात ६६५ असे एकूण ८५० रिक्त ठिकाणांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत, असे जिल्हास्तरीय सेतू समितीचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी कळविले आहे. या केंद्रांसाठी अर्ज भरण्यास सोमवार दि.१७ पासून सुरुवात होणार असून, अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३१ ऑगस्ट अशी आहे. अर्जदारांनी कार्यालयीन वेळेत ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. अर्ज https://chhatrapatisambhajinagar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे उपलब्ध असतील. पुर्ण भरलेले अर्ज नियंत्रण कक्ष,जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे स्विकारण्यात येतील. शासकीय सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत अर्ज स्वीकारण्यात येतील.

# इन्व्हेस्ट इन परभणी'मधून जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला नवी चालना

## पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली 16 ऑगस्टला परभणीत जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :-**जिल्ह्यात उद्योग, व्यवसाय आणि गुंतवणुकीला चालना देण्याच्या उद्देशाने 'इन्व्हेस्ट इन परभणी' या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा उद्योग केंद्र, परभणीच्या वतीने आयोजित ही परिषद रविवार, 16 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 11 ते दुपारी 4 या वेळेत परभणी येथील अक्षदा मंगल कार्यालय येथे होणार आहे.

पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली ही गुंतवणूक परिषद होणार असून उद्योग व सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्षाचे (MAITRI) चे विशेष आयुक्त वैभव वाघमारे तसेच परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

'इन्व्हेस्ट इन परभणी'च्या माध्यमातून परभणी जिल्ह्याची गुंतवणूक क्षमता राज्याच्या औद्योगिक नकाशावर अधिक ठळकपणे मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे. उद्योजकांना नवीन व्यवसाय संधी, संभाव्य गुंतवणूकदारांना जिल्ह्याची क्षमता आणि उद्योग उभारणीसाठी उपलब्ध असलेल्या संधी याबाबत संवादसाधता येणार आहे.

परभणी जिल्ह्यात उद्योग व गुंतवणुकीचे नवे पर्व सुरू करण्याच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार असून, 'गुंतवणूक वाढवा, उद्योग उभारा आणि रोजगाराच्या संधी निर्माण करा' या दिशेने जिल्ह्याला पुढे नेण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरण्याची अपेक्षा आहे.

उद्योजक, व्यापारी, गुंतवणूकदार तसेच उद्योग क्षेत्राशी संबंधित सर्वांनी 'इन्व्हेस्ट इन परभणी' या महत्त्वपूर्ण गुंतवणूक परिषदेस आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर विभागाचे उद्योग व सेवा विभागाचे सह आयुक्त स्वप्निल आर. राठोड व जिल्हा उद्योग केंद्र, परभणीचे सहायक आयुक्त अमोल एस. बाळे यांनी केले आहे.

# कृषीमंत्री दत्तात्रय भरणे शनिवारी परभणी दौऱ्यावर

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे हे शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत.

श्री. भरणे हे दुपारी १२.३० वाजता वाशिम येथून मोटारीने परभणी येथे येणार आहेत. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे आयोजित विविध कार्यक्रमांना ते उपस्थित राहतील. यावेळी नैसर्गिक शेती व सेंद्रिय उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी उभारण्यात आलेल्या प्रगत कीटकनाशक चाचणी व अवशेष विश्लेषण प्रयोगशाळेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी आयोजित कृषी परिसंवादातही ते मार्गदर्शन करतील. तसेच मराठवाडा कृषी विद्यापीठातील प्रकल्पग्रस्तांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात येणार आहे. यानंतर दुपारी 03 वाजता कृषिमंत्री श्री. भरणे हे परभणी जिल्हा व शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीस उपस्थित राहणार आहेत. दुपारी ४ वाजता ते नांदेड येथील विमानतळाकडे मोटारीने प्रयाण करतील.

'पाणी अडवा, पाणी जिरवा'; परभणीत जलसंधारण सप्ताहाची व्यापक तयारी; 15 ते 21 ऑगस्टदरम्यान विविध उपक्रम

# जलसंधारण सप्ताह' अभियानात परभणीकरांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे : जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:--** राज्यातील जलसंधारण चळवळीला व्यापक दिशा देणारे माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या कार्याची प्रेरणा घेत दि. १५ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत परभणी जिल्हयात जलसंधारण सप्ताह, तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत जलसंधारण अभियान राबविण्यात येणार आहे. दि. २१ ऑगस्ट हा सुधाकरराव नाईक यांचा जन्मदिवस असून हा दिवस 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा केला जाणार आहे. यानिमित्त २१ ऑगस्ट रोजी 'महा वॉकथॉन—वॉक फॉर वॉटर' उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय ते वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे क्रीडा संकुल असा सुमारे ३ किलोमीटरचा हा वॉकथॉन असणार आहे. तसेच या दिवशी जिल्ह्यातील प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांनी किमान एक झाड लावावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे. जलसंधारण सप्ताह यशस्वी करण्यासाठी परभणी जिल्ह्यातील प्रत्येकाने उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी यांनी केले.

जलसंधारण सप्ताह व जलसंधारण अभियान याबाबत माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. क.ज. कुच्चे व पत्रकार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. चव्हाण म्हणाले की, मृदसंधारण व जलसंधारण हे केवळ शेतीपुरते मर्यादित नसून शेती, पर्यावरण, जैवविविधता आणि शाश्वत विकासाचा पाया आहे. जलसंधारण सप्ताहात जिल्ह्यात विविध ठिकाणी प्रत्यक्ष कृतीवर भर देण्यात येणार आहे. वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम, अमृत सरोवर भेट, माती नाला बांध व संयुक्त गाळीव बंधाऱ्यांचे जलपूजन, शाळांमध्ये शोषखड्डे तयार करणे, चित्रकला व पोस्टर स्पर्धा, जलमित्र-जलदूत घोषित करणे, जलसंधारण कामांचे भूमिपूजन व लोकार्पण, नाला-तलाव-विहीर स्वच्छता आणि नाला खोलीकरणाच्या कामांना भेटी असे उपक्रम राबविले जातील.

तसेच युवा पिढीला जलसंधारणाच्या कामाशी जोडणे हा जलसंधारण सप्ताहाचा महत्त्वाचा भाग आहे. सप्ताहात महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून डिजिटल तसेच प्रत्यक्ष सहभाग वाढविण्यात येणार आहे. रिल स्पर्धा, चित्रकला, पोस्टर, निबंध, वाद-विवाद, जलमित्र-जलदूत उपक्रम, वृक्षारोपण आणि प्रत्यक्ष जलसंधारण कामांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाणार आहे.

जलसंधारण सप्ताह कार्यक्रमाची सविस्तर रुपरेषा पुढील प्रमाणे आहे. दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण प्रसंगी पालकमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर यांच्या हस्ते जलसंधारण सप्ताहाचा शुभारंभ होणार आहे. यावेळी व जलसंधारणाची शपथ घेतली जाणार आहे. 'Reel for Soil and Water Conservation' या जिल्हास्तरीय स्पर्धेचा शुभारंभ, शालेय विद्यार्थ्यांची नोंदणी, अभियानाच्या लोगोचे अनावरण तसेच जलसंधारण रथास हिरवी झेंडी दाखवून अभियानाला सुरुवात केली जाणार आहे. दि. १६ ऑगस्ट रोजी जलसंधारणाच्या कामांना पर्यावरण संवर्धनाची जोड देत परभणी शहरातील विविध ठिकाणी तसेच शासकीय कार्यालयांच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात येईल. यासोबतच नागरिकांच्या लोकसहभागातून स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ व हरित ठेवण्याचा संदेश देण्यात येईल. दि. १७ ऑगस्ट रोजी जलसंधारणाच्या प्रत्यक्ष कामांना चालना देण्यासाठी अमृत सरोवरांना भेट देण्यात येईल. तसेच माती नाला बांध व संयुक्त गॅबियन बंधाऱ्यांचे जलपूजन करण्यात येईल. शाळांमध्ये पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी शोषखड्डे तयार करण्याच्या उपक्रमाला सुरुवात करण्यात येईल. स्थळ - मौजे दामपुरी व बेलवाडी, ता. गंगाखेड. दि. १८ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांमध्ये जलसंधारणाची जाणीव निर्माण करण्यासाठी 'पाणी बचत' व 'रेनवॉटर हार्वेस्टिंग' या विषयांवर चित्रकला व पोस्टर स्पर्धा घेण्यात येतील.



# इंदुमती झंवर; आज अंत्यसंस्कार

सोयगाव,दि.१४ ऑगस्ट : येथील इंदुमती श्रीराम झंवर (वय.८८)यांचे दि.१४ शुक्रवार रोजी ४:०० वाजता निधन झाले. त्यांच्यावर शनिवार रोजी सकाळी १०:०० वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.त्यांच्या पश्चात तीन मुले,एक मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार होत.दिलीप झंवर यांच्या त्या मातोश्री होत.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# जय जगत एलोरा शिखर परिषदेतून शांतता, न्यायाचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** युवक बिरादरी (भारत) यांच्या वतीने महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि भागीदार संस्थांच्या सहकार्याने आयोजित 'जय जगत एलोरा शिखर परिषद २०२६' शिक्षण, घटनात्मक मूल्ये, शांतता, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार राष्ट्रनिर्मितीचा संदेश देत रविवारी संपन्न झाली. परिषदेत विद्यार्थी, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, विधी क्षेत्रातील मान्यवर आणि युवा परिवर्तनकर्त्यांनी सहभाग घेतला.

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठात झालेल्या मुख्य परिषदेत संशोधन प्रबंध सादरीकरण, वैचारिक चर्चा तसेच विधी क्षेत्रातील मान्यवरांशी संवादाचे आयोजन करण्यात आले. दहा समांतर तांत्रिक सत्रांमध्ये सुमारे १२० संशोधन प्रबंधांचे ऑनलाइन व प्रत्यक्ष सादरीकरण झाले. प्रत्येक सत्राचे दोन परीक्षकांनी परीक्षण केले.

उद्घाटन सत्राची सुरुवात दीपप्रज्वलन व वृंदगानाने झाली. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) ए. लक्ष्मीनाथ यांनी स्वागतपर भाषण केले. युवक बिरादरी (भारत)च्या व्यवस्थापकीय विश्वस्त व उपाध्यक्ष प्रा. स्वर क्रांती यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त सरकारी वकील अ‍ॅड. कविता एन. सोलुंके यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. चारुशीला देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

परिषदेचे प्रमुख अतिथी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती वैषाली पाटील जाधव या विशिष्ट अतिथी म्हणून उपस्थित होत्या. निवृत्त न्यायमूर्ती व युवक बिरादरीच्या नीती परिषदेच्या अध्यक्षा साधना संजय जाधव यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्काराने गौरव करण्यात आला.

परिषदेदरम्यान गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्तीच्या स्वरूपात लॅपटॉपचे वाटप करण्यात आले. न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे, न्यायमूर्ती किशोर सी. संत आणि न्यायमूर्ती वैषाली पाटील जाधव यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. चेतन राठोड, राळेगाव (यवतमाळ) आणि कु. मधु सिंह, शैलेंद्र कॉलेज, दहिसर, मुंबई हे लाभार्थी ठरले.

**दुपारच्या सत्रात 'जय जगतचा पाया म्हणून शिक्षण :** शांततामय, शाश्वत आणि सर्वसमावेशक समाजाची निर्मिती' या विषयावर परिसंवाद झाला. यात न्यायमूर्ती साधना संजय जाधव, प्रा. डॉ. अपर्णा कोट्टापल्ले आणि प्रा. डॉ. गरिमा पाल सहभागी झाले.

समारोप सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती किशोर सी. संत यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिके, संशोधन पुरस्कार व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. 'जय जगत प्रतिज्ञा' आणि 'महाराष्ट्र गीत' सादरीकरणाने परिषदेला समारोप झाला. शिक्षण, न्याय, शांतता आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून समावेशक व जबाबदार समाजनिर्मितीची गरज परिषदेने अधोरेखित केली.

## जिल्हास्तरीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत संस्कृती अकोलकर प्रथम



**कन्नड :** आज गल्लीपासून दिल्लीपर्यंत आणि जगभरात लोकशाही बळकट करण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. अशा व्यापक विषयावर आपल्या ओघवत्या आणि प्रभावी वक्तृत्वातून उपळा येथील शेतकऱ्याच्या मुलीने लक्ष वेधून घेतले. छत्रपती संभाजीनगर येथील एमआयटी महाविद्यालयाच्या वतीने नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत कन्नड येथील कै. काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले.

माध्यमिक गटात संस्कृती निलेश अकोलकर हिने 'लोकशाही बळकट करण्यात युवकांची भूमिका' या विषयावर प्रभावी भाषण सादर करत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील संस्कृतीने लोकशाही, युवकांची जबाबदारी आणि देशाच्या भवितव्यातील तरुणांची भूमिका यावर प्रभावी विचार मांडत उपस्थितांचे लक्ष वेधले.

**प्राथमिक गटात श्रुती जाधव हिने 'माझे आवडते व्यक्तिमत्त्व :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे' या विषयावर वक्तृत्व सादर करून उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. दोन्ही विजेत्या विद्यार्थिनींना ढाल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव सागर जाधव, सचिन भामरे, मुख्याध्यापक दत्तात्रय गायके, तसेच विकास पाटील, दीपक जाधव आणि मार्गदर्शक शिक्षक प्रवीण दाभाडे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. संस्कृतीचे आई-वडील अनुराधा व निलेश कल्याणराव अकोलकर, उपळा येथील ग्रामस्थ, शिक्षक, नातेवाईक यांनीही तिच्या यशाचे कौतुक केले.

## 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाचा गोलटगाव येथे आढावा

### शहरी आयुक्त डॉ. सुनील भोकरे यांच्याकडून प्राथमिक आरोग्य केंद्रातील विविध आरोग्य उपक्रमांची पाहणी



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' या विशेष अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र गोलटगाव येथे विविध आरोग्य सेवांचा आढावा घेण्यात आला. यावेळी शहरी आयुक्त डॉ. सुनील भोकरे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देऊन विविध आरोग्य उपक्रमांची पाहणी केली तसेच अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे यांनी अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामकाजाची प्रास्ताविक माहिती दिली. त्यानंतर सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एस. शैलजा यांनी अभियानाचा सविस्तर अहवाल व सादरीकरण केले. तालुका पातळीवरील कामकाजाचे सादरीकरण तालुका पर्यवेक्षक महेश कल्याणकर, कैलास सरकटे, देशपांडे तसेच तालुका गटसमन्वयक सिद्धार्थ निसर्गंध यांनी केले.

यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न भाले, वैद्यकीय अधिकारी डॉ. रुबीना शेख व डॉ. घोडके यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

आढावा बैठकीदरम्यान माता व बाल संगोपन, गरोदर मातांची नोंदणी, संस्थात्मक प्रसूती, नियमित लसीकरण, प्रयोगशाळेतील तपासण्या, असंसर्गजन्य आजारांशी संबंधित सेवा तसेच आरोग्यविषयक विविध निर्देशकांचा आढावा घेण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्रातील बाह्यरुग्ण विभाग, प्रसूतीगृह, औषध भांडार व उपलब्ध आरोग्य सुविधांचीही पाहणी करण्यात आली.

आशा स्वयंसेविकांचे उजळणी प्रशिक्षण घेणे, अभियानाचा गावपातळीवर व्यापक प्रचार-प्रसार करणे, ग्रामपंचायत सदस्यांचा सहभाग वाढविणे तसेच आवश्यक ठिकाणी फलक व बॅनरद्वारे जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बेसलाईन सर्वेक्षणाच्या आधारे ग्रामपंचायतींचे मूल्यमापन व गुणांकन करून अभियानातील प्रगतीचा नियमित आढावा घेण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

डॉ. सुनील भोकरे यांनी गावनिहाय व वॉर्डनिहाय कामकाजाचे नियमित परीक्षण, अद्ययावत नोंदी व दस्तऐवजीकरण तसेच नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्याच्या सूचना दिल्या.

कार्यक्रमास जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी श्रीमती विद्या सानप, पंचायत समिती सदस्य सुरेंद्र पाटील साळुंके (आबा), विविध ग्रामपंचायतींचे सरपंच व सदस्य, आरोग्य सहाय्यक हिंगे, उणे (पीओ), दिघोळे, अमोल शेख, टाकळकर, आरोग्य सेविका, गटप्रवर्तक शेळके, आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उत्कृष्ट सेवेबद्दल सत्कार

प्राथमिक आरोग्य केंद्रात उल्लेखनीय व उत्कृष्ट सेवा बजावणारे परिचर श्री. मोरे मामा यांचा डॉ. सुनील भोकरे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

## तिरंगा यात्रा संपली, पण जबाबदारी नाही; कार्यकर्त्यांनी मार्गाची केली स्वच्छता



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भव्य तिरंगा यात्रा आणि सभेचा उत्साहपूर्ण समारोप झाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तिरंगा यात्रा मार्गाची स्वच्छता करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला.

तिरंगा यात्रेत मोठ्या संख्येने नागरिक आणि कार्यकर्ते सहभागी झाल्याने मार्गावर पाण्याच्या बाटल्या तसेच इतर कचरा निर्माण झाला होता. यात्रा व सभा संपल्यानंतर दिवसभराच्या धावपळीमुळे कार्यकर्ते थकलेले असतानाही त्यांनी विश्रांती न घेता स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारली.

किशोर शितोळे यांच्यासोबत मराठवाड्याचे संयोजक राहुल लोणीकर, मराठवाड्याचे सहसंयोजक नितीन काळे, शहर सरचिटणीस हर्षवर्धन कराड, नगरसेवक नंदू गवळी, किशोर मानकापे, शंकर अण्णा म्हात्रे, धनंजय कुलकर्णी, यद्रेश बसय्ये, प्रथमेश चौधरी, सचिन गुगळे, मंडळाध्यक्ष तसेच अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते स्वच्छता अभियानात सहभागी झाले.

सर्वांनी मिळून तिरंगा यात्रा मार्गावरील कचरा आणि पाण्याच्या बाटल्या जमा केल्या. जमा झालेला कचरा एका ठिकाणी एकत्र करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याचे नियोजन करण्यात आले. मोठ्या कार्यक्रमानंतरही स्वच्छतेची जबाबदारी गांभीर्याने पार पाडत कार्यकर्त्यांनी नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला. "तिरंगा यात्रेचा उत्साह आणि देशभक्ती जितकी महत्त्वाची आहे, तितकीच आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारीही महत्त्वाची आहे. कार्यकर्त्यांनी थकवा बाजूला ठेवून स्वच्छतेसाठी घेतलेला पुढाकार निश्चितच कौतुकास्पद आहे," असे किशोर शितोळे यांनी सांगितले.

## श्रावण महिना कालावधीत वेरुळ गावात वाहन बंदी

छत्रपती संभाजीनगर, दि.१४ (जिमाका)- श्रावण महिन्यात वेरुळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिरात होणारी भाविकांची गर्दी पाहता भगवान महावीर चौक ते मालोजीराजे भोसले चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी निर्गमित केले आहेत. या आदेशान्वये दि.१४ ते १८, दि.२१ ते २५, दि.२८ ऑगस्ट ते १ सप्टेंबर आणि दि.४ ते ८ सप्टेंबर या कालावधीत रात्री ८ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजेपर्यंत वेरूळ येथील भगवान महावीर चौक ते मालोजीराजे भोसले चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद (नो व्हेईकल झोन) राहणार आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी भगवान महावीर चौक व मालोजीराजे भोसले चौकाच्या पलीकडे वाहनांच्या पार्किंगसाठी मोकळी जागा व पार्किंग व्यवस्था निश्चित करण्यात आली आहे. तेथे वाहनधारकांना आपली वाहने पार्किंग करता येतील. मोटार वाहन कायदा कलम ११५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य किंवा केंद्र शासनाच्या मालकीची वाहने तसेच पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका व अन्य अत्यावश्यक सेवेतील वाहनांना या आदेशातून वगळण्यात आले आहे,असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. भाविकांनी सहकार्य करावे,असे आवाहनही करण्यात आले आहे.

## गिरीस्थान नगरपरिषद खुलताबाद व श्री घृष्णेश्वर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रांगोळी स्पर्धेचे आयोजन व हर घर तिरंगा व स्वच्छतेबाबत जनजागृती



**खुलताबाद प्रतिनिधी :** ८० व्या .स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर "हर घर तिरंगा" अभियान तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना, स्वच्छते विषयी जनजागृती आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याच्या उद्देशाने खुलताबाद शहरात. मुख्याधिकारी .समीर शेख गिरीस्थान नरपरिषद खुलताबाद यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री घृष्णेश्वर महाविद्यालय, प्राचार्य संजय वरकड यांच्या प्रमुख उपस्थितीत खुलताबाद घृष्णेश्वर महाविद्यालय येथे रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते

या रांगोळी स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील २५ -विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून स्वच्छता, सुंदर खुलताबाद शहर रांगोळी काढून सकाळची सुरुवात. व पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्ती, स्वच्छ शहर तसेच राष्ट्रध्वज व देशभक्तीपर विषयांवर आकर्षक रांगोळ्या साकारल्या. विविध रंगांच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश तसेच "हर घर तिरंगा" अभियानाचा उद्देश प्रभावीपणे मांडण्यात आला.

स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण व विल्हेवाट, पर्यावरण संरक्षण आणि राष्ट्रप्रेम याबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी नगर परिषद प्रशासनाच्या वतीने कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे. प्राचार्य संजय वरकड .स्वच्छता निरीक्षक हरिहर चांदोडे लेखपाल सुभाष चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचे पवेयेक्षक परमेश्वर हजारे शहर समवनयक गणेश रोटे विद्यालय विभाग पवेयेक्षक विनोद नागपुरे. संगीता शिंदे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या . अधिकारी/कर्मचारी तसेच श्री घृष्णेश्वर महाविद्यालयाचे , प्राध्यापक शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

स्पर्धेत उत्कृष्ट रांगोळी साकारणाऱ्या सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

हर घर तिरंगा स्वच्छ घर, स्वच्छ परिसर, स्वच्छ खुलताबाद" हा संदेश देत सदर उपक्रम उत्साहात पार पडला.

## सुधारित बीजभांडवल व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना

### सुशिक्षीत बेरोजगारांना अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. १४ (जिमाका)- सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगार व उद्योग उभारणीसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी सुधारित बीजभांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना राबविण्यात येते. या योजनेचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र सुशिक्षित बेरोजगारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक श्रीमती करुणा खरात यांनी केले आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित बीजभांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्यानुसार पात्र लाभार्थ्यांची कर्ज प्रकरणे संबंधित बँकांकडे शिफारशीसाठी पाठविण्यात येणार आहेत.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जांचे वाटप दि. ११ मे पासून सुरू करण्यात आले आहे. अर्ज स्वीकारण्याची सुधारित अंतिम मुदत दि. ३१ ऑगस्ट पर्यंत आहे. या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. इच्छुक सुशिक्षित बेरोजगारांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक श्रीमती करुणा खरात यांनी केले आहे.

## उरण नगरपरिषदेत वारस हक्काने १९ सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती

### 2 वर्षांपासून प्रलंबित प्रश्न नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर यांच्या प्रयत्नामुळे मार्गी



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** गेली २ वर्षे प्रलंबित असलेली वारसा हक्काची नोकरीची समस्या मार्गी लागल्याने सदर निर्णय व नियुक्ती उरण नगरपरिषद आणि १९ नव्याने रुजू झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत आनंदाचा आणि समाधानाचा ठरला.

मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेले आदेश आणि महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिलेले आदेश व संबंधित गरपालिका प्रशासन संचालनालयाने दिलेल्या प्रशासकीय आदेशांच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसांना "वारस हक्क" योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या १९ उमेदवारांनी आज उरण नगरपरिषदेत सफाई कर्मचारी या पदावर अधिकृतपणे रुजू होऊन आपल्या सेवेला प्रारंभ केला.

सुमारे २ वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न सन्माननीय नगरसेवक गणेश शिंदे, अतूल ठाकूर, प्रमिला पवार, मंगेश कासारे यांनी सभागृहात उपस्थित केला. या प्रसंगी नगरसेविका प्रमिला पवार यांनी नगरपरिषद सभागृहात कागदोपत्री पुराव्यासह प्रभावीपणे बाजू मांडली. त्यावेळी नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर यांनी या संदर्भात वरिष्ठ कार्यालय नगरपालिका प्रशासन संचालनालयाकडे पत्रव्यवहार करण्याचे आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे पत्रव्यवहार करून आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरी देण्याबाबतचा अन्याय दूर करण्याची विनंती करण्यात आली.

नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर यांच्या विनंतीला मान देऊन तात्काळ आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांनी उरण नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना तातडीने आदेश दिल्यामुळे अखेर १९ सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. आणि एकूण १९ वारस रुजू होऊन कर्तव्याला सुरुवात केली आहे.

नवीन कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि कुटुंबियांच्या समाधानामुळे हा क्षण अधिक संस्मरणीय ठरला.

याप्रसंगी या संपूर्ण प्रक्रियेत न्यायालयात या विषयावर सातत्यपूर्ण पाठपुरावा करणारे म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियनचे अध्यक्ष अ‍ॅड. सुरेश ठाकूर, कार्याध्यक्ष संतोष पवार आणि सरचिटणीस अनिल जाधव यांनी नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व नगरसेवकांचे अभिनंदन केले.


ही केवळ नोकरीची सुरुवात नसून अनेक कुटुंबांच्या आयुष्यात स्थैर्य, स्वाभिमान आणि नव्या आशेचा किरण घेऊन आलेला दिवस आहे. नगरपरिषदेची स्वच्छता आणि नागरिकांची सेवा या नव्या कर्मचाऱ्यांमुळे अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. नवीन जबाबदारी स्वीकारलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना उत्तम आरोग्य, यश आणि उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त जिंतूर येथे 275 फुट भव्य तिरंगा यात्रा उत्साहात संपन्न

**जिंतूर :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जिंतूर शाखेच्या वतीने २७५ फुट भव्य तिरंगा यात्रेचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी जवाहर विद्यालय, आर्किड इंग्लिश स्कूल व राजमुद्रा अकॅडमी या शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून API चव्हाण सर, संग्राम सोनी विभाग संयोजक मुक्तेश भंडारे जिल्हा संयोजक दर्शन देशमुख शहरमंत्री शताक्षी जैन यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जिंतूर शाखेच्या ऋषिकेश बोखारे, कृष्णा सोनी, रोहित रेघाटे, रोहन कोकडवार, ओम मते, रवीराज थिटे, धनराज घुगे, ओमकार काजळे, सिद्धू नेटके, प्रथम चव्हाण, बबलू थिटे, कृष्णा शहाणे, प्रथमेश देशमुख, शिवम शिकारे, भवन सोळंके, हमेद शेख, विशाल बेले, राहुल बेले, वरद जमगुंडे, अक्षय रोकडे, फय्याज शेख या कार्यकर्त्यांनी केले.



मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911